जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

7 SEP 2017

महाराष्ट्र टाईम्स

**मटा अँकर** शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचा अहवाल

# ध्वनी प्रदूषणात यंदा घट!

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

> **डॉल्बीमुक्त आवाहनाला यंदा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे ध्वनीप्रदूषणात घट झाल्याचे निदर्शनास आले आहे. विद्यापीठाच्यावतीने तीन उपकरणांच्या सहाय्याने रात्रीच्यावेळी ही ध्वनीप्रदूषण पाहणी करण्यात आली. गेल्या दोन वर्षातील आकडेवारी पाहता यावर्षी १५ टक्क्यांनी ध्वनीप्रदूषण कमी झाले आहे.**
>
> **- पी. डी. राऊत, प्रमुख, पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ**

**प्रमुख ठिकाणे आणि डेसिबल**



| | |
|---|---|
| ५५.६३ | सीपीआर |
| ७१.६३ | महाद्वार ते पापाची तिकटी |
| ७४ | गुजरी कॉर्नर |
| ८४ | बिनखांबी गणेश मंदिर |

प्रशासन आणि पोलिसांनी दिलेल्या डॉल्बीमुक्त गणेशोत्सव मिरवणूक आवाहनाला मंडळांच्या कार्यकर्त्यांनी दिलेल्या प्रतिसादामुळे गणेश विसर्जन मिरवणुकीत दरवर्षी होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाची पातळी यंदा १५ टक्क्यांनी कमी झाली. शांतता, रहिवासी, औद्योगिक आणि व्यापारी अशा चार क्षेत्रातील ध्वनीप्रदूषणाचे मोजमाप शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी मंगळवारी केले. केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या ध्वनीपातळी मर्यादेच्या निकषानुसार रात्रीच्यावेळी मिरवणूक मार्गावर केलेल्या या मोजमापासाठी शास्त्रीय पद्धत व नॉइज मॉनिटरिंग इन्स्ट्रुमेंटचा वापर करण्यात आला.

मिरवणुकीत रात्री आठपासून मध्यरात्री एक वाजेपर्यंत ध्वनीप्रदूषण टीपेला पोहोचलेले असते. त्यामुळे या पाहणीसाठी पर्यावरणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी रात्री दहा ते बारा या वेळेतील ध्वनीप्रदूषणाची मोजणी केली. दरवर्षी डॉल्बीमुळे सर्वाधिक ध्वनीप्रदूषण होत असते. गेल्या दोन वर्षांत करण्यात आलेल्या पाहणीत मुख्य मिरवणूक मार्गातील ध्वनीमर्यादेचे उल्लंघन होणाऱ्या स्थळांवर कानठळ्या बनवणारे प्रदूषण होत होते. यंदा हे प्रमाण १५ टक्क्यांनी खाली आल्याचे नोंद झाले.

शांतता क्षेत्र असलेल्या सीपीआर रूग्णालय परिसरात २०१५च्या मिरवणुकीत ७१ डेसिबल आवाज होता तर गेल्यावर्षी हे प्रमाण ६७ डेसिबलवर आले होते. यंदा या भागातील आवाज ५५ .६३ डेसिबलवर स्थिर होता. मिरजकर तिकटी ते पापाची तिकटी या मुख्य मिरवणूक मार्गावर गेल्या दोन वर्षाच्या ध्वनीप्रदूषणाच्या तुलनेत यावर्षी सरासरी १४ टक्क्यांनी घट झाली आहे. दोन वर्षांपूर्वी महाद्वार रोडवर रात्री दहा ते बारादरम्यान १०३ डेसिबल असणारा आवाज यंदा ७१.६३ डेसिबलपर्यंत खाली आला होता. तर गुजरी कॉर्नरला गेल्यावर्षी ९७ डेसिबलइतका घुमणारा आवाज यावर्षी ७४ डेसिबल इतका नोंदवला गेला. बिनखांबी गणेश मंदिर परिसरात मंगळवारी रात्रीच्यावेळी ८४ डेसिबल आवाज असल्याची नोंद झाली. गेल्या वर्षी हे प्रमाण ९६ डेसिबल होते. पापाची तिकटी येथे यावर्षी ८२ डेसिबल आवाज घुमला तर गेल्यावर्षी याठिकाणी ध्वनीने ९८ डेसिबलपर्यंत पातळी गाठली होती. दरम्यान राजारामपुरी, लक्ष्मीपुरी, गंगावेश आणि बिंदू चौक या महत्त्वाच्या स्पॉटवर यावर्षी ७७ ते ८५ डेसिबलपर्यंत होती.

मिरवणूक मार्गालगतच्या मंगळवार पेठ, शिवाजी पेठ आणि शुक्रवार पेठ आणि उत्तरेश्वर पेठ या रहिवाशीक्षेत्रातही ५० ते ६६ डेसिबलपर्यंतच ध्वनीपातळी होती.

- 7 SEP 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ध्वनीपातळी वाढलेलीच; मात्र दोन वर्षांच्या तुलनेत १५ टक्के घट

**पर्यावरणशास्त्र विभागाने गणेशोत्सवात तीन वर्षे केलेली पाहणी**

| झोन | ठिकाण | २०१५ | २०१६ | २०१७ |
|---|---|---|---|---|
| शांतता क्षेत्र | सीपीआर | ७१.८ | ६७.६ | ५५.६३ |
| | न्यायालय | ७१.९ | ६३.२ | ५८.०९ |
| | जिल्हाधिकारी कार्यालय | ६४.७ | ६४.१ | ५६.२४ |
| | शिवाजी विद्यापीठ | – | ५५.२ | ४६.३६ |
| **व्यावसायिक क्षेत्र** | | | | |
| | मिरजकर तिकटी | | ९६.१ | ७७.७५ |
| | बिनखांबी गणेश मंदिर | | ९६.५ | ८४.६६ |
| | महाद्वार रोड | १०३.५ | ९९.७५ | ७१.६३ |
| | गुजरी | १०३.९ | ९७.७ | ७४.९२ |
| | पापाची तिकटी | – | ९८.६ | ८२.७३ |
| | राजारामपुरी | – | ७०.२ | ६३.७२ |
| | लक्ष्मीपुरी | – | ६७.८ | ७२.५२ |
| | शाहुपुरी | – | ६७.७ | ५४.१३ |
| | गंगावेश | – | – | ८५.४३ |
| | बिंदू चौक | – | – | ७७.३६ |

## विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचा अहवाल

प्रतिनिधी
कोल्हापूर

गणेशोत्सवातील आगमन आणि विसर्जन मिरवणुकीतील ध्वनी मर्यादेची पातळी मोजण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या मोजणीत केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या मानकापेक्षा ध्वनीपातळीत वाढ झाल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. मात्र गत दोन वर्षांच्या तुलनेत यंदा १५ टक्के ध्वनीपातळीत घट झाल्याचेही या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

पर्यावरणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांकडून दरवर्षी गणेशोत्सवात आगमन आणि विसर्जन मिरवणुकीत शहराच्या विविध भागातील वाद्यांची ध्वनीपातळी मोजली जाते. शांतता क्षेत्र, रहिवास क्षेत्र, व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रात आवाजाची पातळी मोजण्यात येते. त्याप्रमाणे यंदाही गणेशोत्सवात ध्वनीपातळीची मोजणी केली. यामध्ये २०१५ ते २०१७ या तीन वर्षांच्या तुलनेत ध्वनीमर्यादेत घट झाल्याचा निष्कर्ष काढला आहे.

यंदाच्या मिरवणुकीत बिनखांबी गणेश मंदिर आणि गंगावेश येथे ध्वनीपातळीत काहीप्रमाणात वाढ झाली आहे तर इतर ठिकाणी कमी आहे. पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी.डी. राऊत, डॉ. ए.एस. जाधव, डॉ. एस.बी. मांगलेकर, सहायक प्रा. पल्लवी भोसले, सी.एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली विकास हरेर, अविनाश माने यांनी ही पाहणी केली.

### डॉल्बीमुक्तीमुळे ध्वनीपातळीत यंदा घट



गणेशोत्सवापूर्वी पोलीस प्रशासनाकडून दोन महिने डॉल्बीमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रबोधन करण्यात येत होते. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी वैयक्तिक तालीम संस्था आणि गणेश मंडळांना डॉल्बी न लावण्याचे आवाहन केले. मंत्री पाटील आणि पोलीस प्रशासनाच्या या आवाहनाला प्रतिसाद देत मंडळांनी डॉल्बीला फाटा देत पारंपरिक वाद्यांना पसंती दिली. यामुळे ध्वनीपातळीत घट झाली आहे.

### केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ध्वनीपातळी मानक

| क्षेत्र | रात्रीच्या वेळी |
|---|---|
| औद्योगिक | ७० |
| व्यावसायिक | ५५ |
| रहिवास | ४५ |
| शांतता क्षेत्र | ४० |

7 SEP 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नो डॉल्बी'मुळे ध्वनिप्रदूषण पातळी १५ टक्क्यांनी कमी!

## गणेशोत्सवात पर्यावरणशास्त्र विभागाकडून ध्वनी पातळीचे मापन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीत निर्धारित मर्यादेपेक्षा ध्वनिप्रदूषण पातळी अधिक असली, तरीही डॉल्बीविरहित मिरवणुकांमुळे गत दोन वर्षांपेक्षा यंदा ध्वनिप्रदूषण पातळी १५ टक्क्यांनी कमी झाल्याचा निष्कर्ष पर्यावरणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या ध्वनी पातळी मापनातून समोर आला आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या आठ विद्यार्थ्यांच्या पथकाने गणेशोत्सव काळात दि. २५ ऑगस्ट व दि. ५ सप्टेंबर २०१७ या दिवशी ध्वनी पातळ्या मोजल्या. या मापनाकरिता 'नॉईज मॉनिटरिंग इन्स्ट्रूमेंट' वापरण्यात आले. दि. ५ सप्टेंबर रोजी दिवसभर कोल्हापुरातील सर्व महत्त्वाच्या भागामध्ये ध्वनी पातळी मोजण्यात आली.

> "गणेशमूर्ती विसर्जन मिरवणुकीत गणेश मंडळांनी डॉल्बी न लावण्याचा सकारात्मक निर्णय घेतल्याने ध्वनी पातळी १५ टक्क्यांनी कमी झाली. आगामी काळातही ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी मंडळांनी विधायक पावले उचलावीत.
>
> – डॉ. पी. डी. राऊत,
> विभागप्रमुख पर्यावरणशास्त्र,
> शिवाजी विद्यापीठ

'सीपीसीबी' स्टँडर्डनुसार रात्रीच्या वेळी इंडस्ट्रियल झोन (७०), कमर्शियल झोन (५५), रेसिडेन्शियल झोन (४५) व सायलंट झोन (४०) डेसिबल क्षमता असते. अनंत



चतुर्दशीच्या मिरवणुकीवेळी फक्त रात्रीच्या वेळच्या मागील तिन्ही वर्षांच्या ध्वनी पातळ्या पाहिल्यास ध्वनी पातळी वाढलेल्या आहेत.

मात्र, २०१७ च्या मिरवणुकीमध्ये बिनखांबी गणेश मंदिर व गंगावेस येथे ध्वनी पातळी थोड्याप्रमाणात वाढलेली दिसते; पण इतर ठिकाणी ती त्या प्रमाणात कमी असल्याची दिसून येते. शहरातील सर्व ठिकाणी करण्यात आलेल्या निरीक्षणांवरून यावर्षीच्या गणेशोत्सवात ध्वनी पातळी केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या (सीपीसीबी) मानकापेक्षा वाढलेली आहे. मागील वर्षापेक्षा सरासरीने ती १५ टक्क्याने कमी झाल्याची माहिती निष्कर्षांमधून पुढे आली आहे.

**मागील तीन वर्षांतील आकडेवारी..**

| झोन | स्थळ | २०१५ | २०१६ | २०१७ |
|---|---|---|---|---|
| सायलंट झोन | सीपीआर | ७१.८ | ६७.६ | ५५.६३ |
| | न्यायालय | ७१.९ | ६३.२ | ५८.०९ |
| | जिल्हाधिकारी कार्या. | ६४.७ | ६४.१ | ५६.२४ |
| | शिवाजी विद्यापीठ | ..... | ५५.२ | ४६.३६ |
| रेसिडेन्शियल झोन | राजारामपुरी | ६१.२ | ६२.४ | ४९.१३ |
| | उत्तरेश्वर पेठ | ७३.४ | ६३.५ | ६६.२४ |
| | शिवाजी पेठ | ...... | ६३.८ | ५०.९६ |
| | मंगळवार पेठ | ...... | ७९.९ | ६०.८५ |
| | नागाळा पार्क | ...... | ५८.५ | ५०.९६ |
| | ताराबाई पार्क | ...... | ६१.८ | ४८.२४ |
| कमर्शियल झोन | मिरजकर तिकटी | ..... | ९६.१ | ७७.७५ |
| | बिनखांबी गणेश मंदिर | .... | ९६.५ | ८..६६ |
| | महाद्वार रोड | १०३.५ | ९९.५ | ७१.६३ |
| | गुजरी | १०३.९ | ९७.७ | ७४.९२ |
| | पापाची तिकटी | ...... | ९८.६ | ८२.७३ |
| | राजारामपुरी | ..... | ७०.२ | ६३.७२ |
| | लक्ष्मीपुरी | ..... | ६७.८ | ७२.५२ |
| | शाहूपुरी | ..... | ६७.७ | ५४.१३ |
| | गंगावेस | ...... | ...... | ८५.४३ |
| | बिंदू चौक | ..... | ...... | ७७.३६ |
| इंडस्ट्रियल झोन | उद्यमनगर | ६७.५ | ६७.५ | ५५.६२ |
| | वाय. पी. पोवारनगर | ६७.० | ६१.३ | ५४.३३ |

7 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ध्वनी प्रदूषणाची पातळी १५ टक्क्यांनी कमी

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवात २५ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत ध्वनी प्रदूषणाची पातळी मोजली.

या मापनाकरिता नॉईज मॉनिटरिंग उपकरणाचा वापर केला. २०१५, १६, १७ च्या अनंत चतुर्दशी मिरवणुकीच्या वेळी तिन्ही वर्षांची ध्वनीची पातळी पाहिल्यास असे दिसून येते की, तिन्हीही वर्षी ध्वनीची पातळी वाढलेलीच आहे; मात्र यंदाच्या मिरवणुकीत बिनखांबी गणेश मंदिर, गंगावेस येथे ध्वनीची पातळी थोड्या प्रमाणात वाढलेली दिसते; पण इतर ठिकाणी ती प्रमाणात कमी दिसते. या निरीक्षणावरून असे दिसून येते की, यंदा ध्वनीची पातळी केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या मानकापेक्षा वाढलेलीच आहे; मात्र ती गतवर्षीपेक्षा सरासरी १५ टक्क्यांनी कमी आहे. ध्वनी प्रदूषणाचा अभ्यास करणाऱ्या चमूमध्ये पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत, डॉ. सौ. ए. एस. जाधव, डॉ. एस. बी. मांगलेकर, सहायक प्राध्यापक पल्लवी भोसले, सी. एस. भोसले, विकास हरेर, अविनाश माने यांचा समावेश आहे.

**अनंत चतुर्दशीच्या दिवशी रात्रीची ध्वनी प्रदूषण पातळी (डेसिबलमध्ये)**

| विभाग | परिसर | वर्ष २०१५ | २०१६ | २०१७ |
|---|---|---|---|---|
| निवास क्षेत्र | राजारामपुरी | ६१.२ | ६२.४ | ४९.१३ |
| | उत्तरेश्वर पेठ | ७३.४ | ६३.५ | ६६.२४ |
| | शिवाजी पेठ | - | ६३.८ | ५०.९६ |
| | मंगळवार पेठ | - | ७९.९ | ६०.८५ |
| | नागाळा पार्क | - | ५८.५ | ५०.९६ |
| | ताराबाई पार्क | - | ६१.८ | ४८.२४ |
| व्यापारी क्षेत्र | मिरजकर तिकटी | - | ९६.१ | ७७.७५ |
| | बिनखांबी गणेश मंदिर | - | ९६.५ | ८४.६६ |
| | महाद्वार रोड | १०३.५ | ९९.५ | ७१.६३ |
| | गुजरी | १०३.९ | ९७.७ | ७४.९२ |
| | पापाची तिकटी | - | ९८.६ | ८२.७३ |
| | राजारामपुरी | - | ७०.२ | ६३.७२ |
| | लक्ष्मीपुरी | - | ६७.८ | ७२.५२ |
| | शाहूपुरी | - | ६७.७ | ५४.१३ |
| | गंगावेस | - | - | ८५.४३ |
| | बिंदू चौक | - | - | ७७.३६ |
| औद्योगिक क्षेत्र | उद्यमनगर | ६७.५ | ६७.५ | ५५.६२ |
| | वाय. पी. पोवार नगर | ६७.६ | ६१.३ | ५४.३३ |

**प्रदूषण मंडळाची मानके**

| विभाग | रात्रीची वेळ |
|---|---|
| औद्योगिक | ७० |
| व्यापारी | ५५ |
| निवासी क्षेत्र | ४५ |
| शांतताप्रवण | ४० |

**शांतताप्रवण क्षेत्र**

| | | | |
|---|---|---|---|
| सीपीआर | ७१.८ | ६७.६ | ५५.६३ |
| न्यायालय | ७१.९ | ६३.२ | ५८.०९ |
| जिल्हाधिकारी | ६४.७ | ६४.१ | ५६.२४ |
| विद्यापीठ | - | ५५.२ | ४६.३६ |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 SEP 2017

महाराष्ट्र टाईम्स



# रिलायन्स जीओशी विद्यापीठाचा करार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांना वाय-फाय सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने रिलायन्स जिओशी सामंजस्य करार केला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या या करारप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के,कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले व इंटरनेट विभाग समन्वयक डॉ. मिलिंद जोशी उपस्थित होते. रिलायन्स जिओतर्फे बालसुब्रमह्मण्यम अय्यर व किशोर पाटील उपस्थित होते. सामंजस्य करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी तर रिलायन्सतर्फे अय्यर यांनी स्वाक्षरी केल्या.

शिवाजी विद्यापीठाने केलेल्या या सामंजस्य करारानुसार रिलायन्स जिओतर्फे विद्यापीठाच्या प्रांगणात वाय-फाय सुविधा माफक दरात उपलब्ध होणार आहे. उपकरणे व देखभालीचा खर्च रिलायन्स जिओ करणार आहे. सध्या विद्यापीठाशी संलग्नित १६२ महाविद्यालयांत रिलायन्स जिओतर्फे वाय-फाय सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे ही सर्व महाविद्यालये विद्यापीठास जोडली जातील. विद्यापीठासह महाविद्यालयांत होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे प्रक्षेपण जिओ सेवेद्वारे करता येणे शक्य होणार आहे. विविध सुविधा विद्यापीठात उपलब्ध होणार आहेत. तसेच, जिओ चॅट सेवेद्वारे दृश्य (व्हिडिओ) संपर्क साधणे सुलभ होणार आहे अशी माहिती कुलगुरू डॉ. शिंदे यांनी दिली.

7 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ-जिओमध्ये वाय-फायसाठी करार



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, रिलायन्स जिओशी सामंजस्य कराप्रसंगी उपस्थित कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी मान्यवर.

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना वाय-फाय सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने रिलायन्स जिओशी सामंजस्य करार केला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या कराप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त, लेखाधिकारी अजित चौगुले, इंटरनेट विभाग समन्वयक डॉ. मिलिंद जोशी उपस्थित होते. रिलायन्स जिओतर्फे बालसुब्रमण्यम अय्यर, किशोर पाटील उपस्थित होते. सामंजस्य करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी, तर रिलायन्सतर्फे श्री. अय्यर यांनी स्वाक्षरी केल्या. सामंजस्य करारानुसार रिलायन्स जिओतर्फे विद्यापीठाच्या प्रांगणात वाय-फाय सुविधा माफक दरात उपलब्ध होईल. उपकरणे, देखभालीचा खर्च रिलायन्स जिओ करेल. विद्यापीठ वर्धापन दिनादिवशी ही सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करण्यात येत आहे. सध्या विद्यापीठाशी संलग्नित १६२ महाविद्यालयांत रिलायन्स जिओतर्फे वाय-फाय सुविधा उपलब्ध केली आहे. त्यामुळे ही सर्व महाविद्यालये विद्यापीठास जोडली जातील. विद्यापीठासह महाविद्यालयांत होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे प्रक्षेपण जिओ सेवेद्वारे करता येणे शक्य होईल. तसेच जिओ चॅट सेवेद्वारे दृश्य (व्हिडिओ) संपर्क साधणे सुलभ होईल.

7 SEP 2017 महाराष्ट्र टाईम्स जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यघटनेतील मूल्यांविषयी सजगता हवी

**प्रा. डॉ. जगन कराडे यांचे मत**

**कोल्हापूर** : 'कल्याणकारी राज्याबरोबरच सर्व व्यक्तीच्या उत्थानाचे तत्व भारतीय राज्यघटनेत समाविष्ट केलेले आहे. मानवी जीवनशैली उंचावण्याचा हक्क प्रत्येक नागरिकाला दिला आहे. परंतु आज स्वातंत्र्याची ७० वर्षे ओलांडली तरी घटनेने दिलेले सर्व हक्क आणि सामाजिक न्याय खऱ्या अर्थाने सर्व वर्जापर्यंत पोहोचले की नाही, याचा अभ्यास करण्याची आज अत्यंत गरज आहे,' असे मत शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांनी व्यक्त केले.

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये अग्रणी महाविद्यालयांतर्गत समाजशास्त्र विभागामार्फत 'मानवी हक्क व सामाजिक न्याय' या विषयावर कार्यशाळा झाली. त्यावेळी उद्घाटक व बीजभाषक म्हणून ते बोलत होते. डॉ. कराडे यांनी 'मानवी हक्क : भारतीय संदर्भात' या विषयावर विचार व्यक्त केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे होते.

डॉ. कराडे म्हणाले, 'सर्व समाजाचे कल्याण व्हावे आणि कल्याणकारी राज्य निर्माण व्हावे तसेच मानवाला जन्मत:च जाती, धर्म, लिंग, जन्मगाव यावर आधारित कोणताही भेदभाव होणार नाही. ही तत्त्वे राज्यघटनेत समाविष्ट केली आहेत. त्याची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षित आहे.'



राजर्षी शाहू कॉलेजमध्ये आयोजित कार्यशाळेत बोलताना डॉ. जगन कराडे. शेजारी डॉ. सी. जे. खिलारे, बी. आर. नदाफ.

कार्यशाळेच्या प्रयोजनासंदर्भात समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. बी. आर. नदाफ यांनी प्रास्ताविक केले. प्रा. ममता कन्नाडे यांनी आभार मानले.

'सामाजिक हक्क, न्याय व रुढी,' या विषयावर प्रा. प्रभूदास आनंदराव खाबडे यांनी मार्गदर्न केले. शाहू कॉलेजचे मराठी विभागप्रमुख प्रा. सुहास निर्मळे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. समारोप सत्रात डॉ. व्ही. एम. पाटील यांनी 'भारतीय राज्यघटना व मानवाधिकार,' या विषयावर विचार मांडले. अध्यक्षस्थानी शाहू कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. राजेंद्र देठे होते. प्रा. डॉ. सिंधू आवळे यांनी आभार मानले. कार्तिक कुलकर्णी, प्रा. मनीषा कदम, पूजा पवार व डॉ. सुरेश आपटे आदींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यशाळेसाठी लीड कॉलेज समितीचे प्रमुख प्रा. एम. डी. कदम यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांनी मार्गदर्शन केले. समाजशास्त्र विभागाच्या प्रा. ममता कन्नाडे यांनी समन्वयक व प्रा. बी. आर. नदाफ यांनी सहसमन्वयक म्हणून काम केले. सूत्रसंचालन प्रा. डी. सी. तुळशीकट्टी यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स

# प्रतिसरकार हा अन्यायाविरोधातील आवाज

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

**शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा**

'सर्वसामान्य ग्रामीण जनतेवरील अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद करण्याचे कार्य प्रति सरकारने केले,' असे प्रतिपादन प्रा.डॉ.अरुण भोसले यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि जी.डी.बापू लाड प्रतिष्ठान, कुंडल यांच्या संयुक्त विद्यमाने मानव्यशास्त्र इमारतीच्या सभागृहामध्ये आयोजित 'जी.डी.बापू लाड आत्मकथन : एक संघर्ष यात्रा' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेमध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी क्रांती उद्योग आणि शिक्षण समूहाचे प्रमुख अरुण लाड होते.

डॉ. भोसले म्हणाले, 'कर्जमुक्त करणे, अन्याय, अत्याचार आणि भय नाहीस करणे म्हणजे स्वातंत्र्य ही जी.डी. बापूंची भूमिका सामान्य माणसाला भावली होती. साताऱ्याचे प्रतिसरकार हा एक गौरवशाली अध्याय होता. याचे सूत्रसंचालक जी.डी.बापू लाड होते. गुंड टोळ्यांचा निपटारा करण्याचे काम प्रतिसरकारने केल्यामुळे जनतेचा विश्वास दृढ होत गेला. प्रतिसरकारच्या कार्यामधून समाधानाची भावना निर्माण झाली. भारतात चार-पाच ठिकाणी प्रतिसरकारांची स्थापना झाली. त्यामध्ये उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्रातील सातारा होते.'

कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर म्हणाले, 'जी.डी.बापू लाड जसे परखड होते, तसे प्रांजळही होते. सामान्य शेतकरी कुटुंबातील जी.डी. बापू यांनी केलेले कार्य आजच्या डिजीटल युगामधील तरुण पिढीला प्रेरणादायी आहे.'

अरुण लाड म्हणाले, '१९४२ ची छोडो भारत ही चळवळ इस्लामपूर आणि तासगांव या ठिकाणी मोठ्या प्रमाणात झाली. या काळात जी.डी. बापूंनी स्वातंत्र्य लढ्यासाठी तुफान सैनिकांची शाळा उभी केली. तरुणांसाठी उद्योगधंदे निर्माण करण्याचे कार्य केले. समाजासाठी, शेतकऱ्यांसाठी, उद्योग व्यवसायासाठी त्यांनी केलेले कार्य फार मोलाचे आहे.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 SEP 2017

महाराष्ट्र टाईम्स

# मोडी लिपी अभ्यासक्रम

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज इतिहास संशोधन केंद्रातर्फे ८ ते १९ सप्टेंबरदरम्यान कालावधीमध्ये मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला आहे. कोल्हापुरातील व इतर पुराभिलेखागारात असंख्य मोडी कागदपत्रे उपलब्ध आहेत. त्यांचा अभ्यास करण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान आवश्यक आहे. मोडी लिपीचा जास्तीत जास्त प्रसार व्हावा म्हणून या अभ्यासक्रमाचे आयोजन केलेले आहे. या अभ्यासक्रमामध्ये औरंगाबाद येथील मोडी तज्ज्ञ मच्छिंद्र चौधरी व केंद्र समन्वयक डॉ.नीलांबरी जगताप यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.